C

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 59 ]
Total No. of Questions : 59 ]

**CCE PF**
**CCE PR**
**NSR & NSPR**

Question Paper Serial No. **302**

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**
**Code No. : 08-M**

येथून कापा.

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
## Subject : First Language — MARATHI

**(ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**
**( Private Fresh & Private Repeater / NSR & NSPR )**

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

ದಿನಾಂಕ : 28. 03. 2022 ] [ Date : 28. 03. 2022
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

### विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघूत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 59 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघूत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **10 × 1 = 10**

1. 'परिणयातुर' या संधीचा विग्रह या प्रमाणे होतो –

   (अ) परिणया + आतुर (ब) परिणय + आतुर

   (क) परिण + अतुर (ड) परिणयः + आतुर.

2. चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय हे आहेत –

   (अ) स, ला, ते, स, ला, ना, ते (ब) ऊन, हून

   (क) चा, ची, चे (ड) ने, ए, शी.

3. "सौरभने पोवाडा म्हटला" या वाक्यात हा प्रयोग आहे –

   (अ) भावे प्रयोग (ब) कर्तरी प्रयोग

   (क) यापैकी नाही (ड) कर्मणी प्रयोग.

4. "शामल उद्या म्हैसूरला जाईल" या वाक्यात हा काळ आहे –

   (अ) वर्तमानकाळ (ब) भविष्यकाळ

   (क) अपूर्ण भूतकाळ (ड) भूतकाळ.

5. "जो पर्यंत आपल्याकडे पैसा आहे, तो पर्यंत अनेक माणसे गोळा होतात" या आशयाची म्हण कोणती ?

(अ) गरज सरो वैद्य मरो (ब) एक घाव दोन तुकडे

(क) असतील शिते तर जमतील भुते (ड) कोरड्याबरोबर ओलेही जळते.

6. 'विश्वसंहार' या समासाचा प्रकार हा आहे –

(अ) षष्ठी तत्पुरुष समास (ब) द्वंद्व समास

(क) बहुव्रीही समास (ड) मध्यमपदलोपी समास.

7. "माझे डोके <u>किल्ल्यात</u> पाडावे" या वाक्यातील अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे –

(अ) पंचमी (ब) सप्तमी

(क) संबोधन (ड) प्रथमा.

8. "तो दररोज शाळेला वेळेवर येतो." या वाक्यात हा काळ आहे –

(अ) रीती वर्तमानकाळ (ब) भूतकाळ

(क) भविष्यकाळ (ड) साधा भूतकाळ.

9. ................ गुळाची चव काय ? ही म्हण पूर्ण होण्यास हा शब्द घालावा लागेल –

(अ) बैलाला (ब) उंदराला

(क) मूर्खाला (ड) गाढवाला.

10. 'नेत्रदान' या समासाचा विग्रह असा होतो –

(अ) नेत्र हेच दान (ब) नेत्ररूपी दान

(क) नेत्र, दान वगैरे (ड) नेत्राचे दान.

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध आळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :**

**5 × 1 = 5**

11. दृष्टी असणारा : डोळस : : समाजाची सेवा करणारा : ................

12. श्रीमंत : गरीब : : सुख : .............

13. तनय : मुलगा : : सूर्य : .................

14. कडू : गुणविशेषण : : बापरे ! : .......................

15. मनाचे पिंजरे : लघुनिबंध : : जपानी स्त्री : .......................

**III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **8 × 1 = 8**

16. महानुभाव पंथाचे संस्थापक कोण ?

17. किल्यामधील भेद जाणून घेण्यासाठी कोणत्या सरदारांनी सुतारकाम पत्करले ?

18. बेळगावीच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते ?

19. लोकसाहित्यात माहेरचा दूत असे कोणाला म्हटले आहे ?

20. केशवकुमार यांचा विडंबन काव्यसंग्रह कोणता ?

21. दिमाखात नटूनथटून कोण जात आहे ?

22. भुकेलेल्या पोटांना कोणती गोष्ट वर्ज्य नाही असे विंदा करंदीकर म्हणतात ?

23. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री कोण होते ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

24. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) पाणउतारा करणे   ब) काबिज करणे

25. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

    विद्या ही महासागरासारखी आहे.

26. गण पाडून वृत्त ओळखा.

    ''सहज हवन होते नाम घेता फुकाचे''

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **12 × 2 = 24**

27. डोळस मनुष्याने आंधळ्यांना कसे समजावले ?

28. चिमाजी अप्पांनी कोणता निर्धार व्यक्त केला ?

29. लेखक श्री अनंत काणेकर यांचा परिचय लिहा.

30. गंगूबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधींनो सन्मानीत करण्यात आले ?

31. चांगला शकुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला कोणकोणती प्रलोभने दाखवितात ?

32. "देवा रे ! मग ती स्फुंदे ! एवढा तरी जाऊ दे !" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

33. भुकेलेले जीव काय करतील असे कवी म्हणतो ?

34. "आम्ही अगदी अंधारात होतो" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

35. रुक्मिणी स्वतःचे हरण करण्याचा कोणता उपाय श्रीकृष्णाला सुचविते ?

36. उद्योगी तरुण कसा असला पाहिजे ? का ?

37. "भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

38. कवी मंगेश पाडगावकर यांचा परिचय लिहा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

39. अ) प्रयत्नांती परमेश्वर

ब) समाजसेवा हीच खरी ईश्वर सेवा.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा : 13 × 3 = 39**

40. आंबेडकरांचे तिसरे दैवत कोणते ? त्याबद्दल ते काय सांगतात ?

41. पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकरांनी कसा पटवून दिला आहे ?

42. कमीज खाँच्या समवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.

43. शेवटी गणातात्यांनी कोणता निर्धार व्यक्त केला ? का ?

44. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दिल्या ?

45. श्रीकृष्णाशी आपला विवाह व्हावा यासाठी रुक्मिणीने कोणकोणते प्रयत्न केले ?

46. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु कसे फसवितात ?

47. मार्कंडेयाची तुलना यशवंतांनी देशभक्तांशी का केली आहे ?

48. पृथ्वीचे प्रेम आपल्याला मिळावे यासाठी कोणकोण व कशाप्रकारे आर्जवे करीत आहे ?

49. धरण या कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन करा.

50. विद्या प्राप्त करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले ?

51. गंगूबाईच्या गळ्यावर शस्त्रक्रिया का झाली ? त्याचा त्यांच्यावर कोणता परिणाम झाला ?

**किंवा**

बेळगावच्या काँग्रेस अधिवेशनात स्वागतगीत कोणी म्हटले ? त्या बद्दलचा त्यांचा अनुभव सविस्तर लिहा.

52. हतबुद्ध झालेल्या लोकांना समाजसेवक नवी दृष्टी कशी देतात ?

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

53. चाफा, बांबू, पपया, कडुनिंब या झाडांबद्दल गुलजार काय सांगतात ?

**किंवा**

'हिरवे सांगाती' या पाठात आलेल्या वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.

54. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

**किंवा**

लेखकाने काकूंना कामावरुन काढून का टाकले ? सविस्तर लिहा.

55. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा भावार्थ तमच्या शब्दात लिहा.

56. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

पहिल्या ....................................

................................................

........................................ दारूण

................................................

................................................

................................................

......................................... पोटी.

**किंवा**

म्हटले ......................................

...............................................

...................................... संचार

...............................................

...............................................

.............. ................................

...................................... अत्तर.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**2 × 2 = 4**

57. 'श्यामची आई' सारख्या सोज्वळ व सात्विक संस्कार करणाऱ्या पुस्तकाची आज विशेषच गरज आहे; या कादंबरीतला गोविंदा म्हणतो, ''चांगल्या गोष्टींचे चिंतन केल्याने मनुष्य चांगला होत जातो.'' ही कादंबरी असे चिंतन करते व वाचकांना करायला लावते.

'श्यामची आई' हे एक बोधप्रद पुस्तक आहे. ते आपल्याला आदर्शाची शिकवण देते. स्वार्थत्याग, प्रामाणिकपणा, बंधुभाव, निगर्वीपणा अशा सद्‌गुणांचा बोध आपल्या अंतःकरणावर बिंबवते. खरा मोठेपणा कशात असतो ते सांगते.

श्याम म्हणतो, "मोठेपणा याचा अर्थ जगातील काही व्यक्तींच्या ओठावर आपले नाव काही काळ नाचणे, असा मी करीत नाही."

**प्रश्न :**

अ) 'श्यामची आई' हे पुस्तक आपल्याला कोणती शिकवण देते ?

ब) 'श्यामची आई' सारख्या पुस्तकाची आज विशेष गरज का आहे ?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

58. प्रतिभा कारंजी गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल तुमच्या मित्राचे / मैत्रिणीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

बँकेत खाते उघडण्यासाठी बँक अधिकाऱ्याला विनंती अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** **1 × 5 = 5**

59. अ) राष्ट्रीय एकात्मता - काळाची गरज

ब) आइ हे परमदैवत.